# कर्तबगार शिल्पकार कै. केशव बाबुराव लेले

डॉ. वा. के. लेले
पुणे
13-03-2001

मुंबई शहराच्या सांस्कृतिक जीवनात सुमार साठ वर्षांपूर्वी लेले चित्रकला प्रदर्शनास एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान होते. शिल्पकार कै. केशव बाबुराव लेले हे आपल्या हालत्या-चालत्या शिल्पाकृतींचे प्रदर्शन रामबाग [सी.पी.टँक] नायगाव [दादर], कुर्ला, प्रभादेवी, माहिम, बांद्रा इत्यादी ठिकाणी भरवीत असत आणि ते पाहण्यास हजारो प्रेक्षकांची गर्दी होत असे. त्या प्रदर्शनातील हालते पुतळे पाहून आपण कसे मंत्रमुग्ध होऊन जात असू ~~[illegible] [illegible]~~, ते उन्मेखून सांगणारे वृध्द प्रेक्षक आजही मला अनेकदा भेटतात. चालू वर्ष हे त्या थोर शिल्पकाराचे शताब्दीचे साल आहे. त्या निमित्ताने ही संस्मरणपूर्वक श्रध्दांजली.

कै. केशव बाबुराव लेले यांचा जन्म सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या देवगड तालुक्यातील मुणगे या गावी २३ मार्च १९०१ रोजी झाला. त्यांचे घराणे शेवडकर लेले म्हणून ओळखले जात. त्यांचे वडील बाबुराव वामन लेले हे मुणगे गावी शेती व सावकारी करीत असत. गणपतीच्या मूर्ती बनवण्यात त्यांचा हातखंडा होता. ते आपल्या कुळांशी अतिशय औदार्याने वागत असल्यामुळे त्यांची प्राप्ती बेताचीच होती. त्यांना गणेश, केशव, विनायक व वासुदेव असे चार मुलगे आणि काशी व येसू अशा दोन मुली अशी सहा अपत्ये होती. बाबुरावांचे सगळ्यात थोरले चिरंजीव गणेश हे उत्तम मूर्तिकार, कवी, कादंबरीकार, नाटककार, नट व गायक होते. बाबुराव १९१४ सालच्या पूर्वार्धात अचानक वारल्यामुळे गणेशरावांनी आपले शिक्षण अर्धवट सोडले आणि मुंबईला नोकरी पत्करली. तिकडे केशवरावांनी मुणग्याला वडिलांची शेती व सावकारी सांभाळण्यास सुरुवात केली. पण १९१८ साली गणेशराव राजयक्ष्माने आजारी पडले. त्या काळात त्या रोगावर आजच्याइतकी प्रभावी औषधे नसल्यामुळे गणेशरावांना मुंबईची नोकरी सोडून कायमच्या वास्तव्यासाठी मुणग्याला जाऊन राहावे लागले तेव्हा समस्त कुटुंबाची जबाबदारी केशवरावांवर येऊन पडली. अर्थार्जन करण्यावाचून त्यांना गत्यंतर नव्हते. परिणामी ते मुंबईला गेले आणि तेथे ~~[illegible]~~ त्यांनी श्री पांडुरंग लेले यांच्या पेढीवर नोकरी धरली. तेथे काही दिवस घालवल्यावर त्यांनी विख्यात शिल्पकार कै. रघुनाथ कृष्ण फडके यांचे शिष्यत्व स्वीकारले

आणि ~~[struck-out word]~~ मेणाच्या व प्लॅस्टर ऑफ् पॅरिसच्या हालत्या चित्रांची कला लवकरच आत्मसात केली. १९२५ साली इंग्लंडमध्ये वेम्ब्ले (Wembley) येथे भरलेल्या अतिभव्य आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात फडके यांच्या मेणाच्या मूर्तींच्या प्रदर्शनाचे (त्या प्रदर्शनाला तत्कालीन इंग्रजी वृत्तपत्र Phadke's Fine Art Works म्हणत असत) व्यवस्थापक या नात्याने केशवराव इंग्लंड-ला गेले. त्याबाबतीतील एक विशेष उल्लेखनीय गोष्ट अशी की, त्यांनी बोटीच्या तीन आठवड्याच्या प्रवासात इंग्रजी संभाषणकला अभ्यासाने उत्तम रीतीने आत्मसात केली. इंग्लंडमध्ये त्यांचे सुमारे सहा महिने वास्तव्य होते आणि त्या काळात तीन इंग्रज पुरुष व तीन इंग्रज स्त्रिया त्यांच्या हाताखाली काम करीत होत्या. वेम्ब्ले-प्रदर्शनात फडके यांच्या कलाकौशल्याची खूप वाहवा झाली. 'तिचा काही वाटा केशव बाबुराव लेले यांसही आहेच', असा निर्वाळा विविधवृत्ताच्या २३-११-२७ च्या अंकात देण्यात आला होता. मुंबईच्या हेरल्ड दैनिकाने तर आपल्या ११-१२-२७ च्या अंकात केशवरावांचा 'a Wembley man' असा गौरवपूर्ण उल्लेख केला होता.

१९२६ साली अमेरिकेला स्वातंत्र्य मिळाल्यास दीडशे वर्षे झाल्याच्या निमित्ताने फिलाडेल्फिया येथे 'Sesqui-Centennial Exposition' नावाचे विशाल आंतरराष्ट्रीय प्रदर्शन भरविण्यात आले होते. तेथे भारतीय बनावटीच्या औद्योगिक व कलाकौशल्याच्या वस्तूंच्या प्रदर्शनांतर्गत शिल्पकार फडके यांच्या मेणाच्या हालत्या चित्रांचेही प्रदर्शन मांडण्यात आले होते. त्याचे व्यवस्थापक व एकूण भारतीय दालनाचे संयोजक म्हणून केशवराव अमेरिकेला गेले होते व तेथे त्यांचे नऊ महिने वास्तव्य होते. ते २८ जानेवारी १९२७ रोजी भारतात परत आले. त्यांनी आपल्या अमेरिकेतील अनुभवांसंबंधी वृत्तपत्रांना दिलेल्या मुलाखती नवाकालमध्ये १०-२-१९२७ रोजी व केसरीत ५-२-२७ रोजी प्रसिद्ध झाल्या होत्या.

वेम्ब्ले व फिलाडेल्फिया येथील जागतिक प्रदर्शनांत भाग घेण्याची संधी मिळाल्यामुळे केशवरावांना तशा प्रकारच्या प्रदर्शनांचे प्रारूप, प्रत्यक्ष कार्य व उपयुक्तता यांचा अभ्यास करता आला. त्याच्या आधारे त्यांनी मुंबईला रामबागेत एक व्यापक स्वरूपाचे कलाप्रदर्शन ऑक्टोबर १९२७ मध्ये भरवले होते आणि त्यात मुंबईतील काही चित्रकारांच्या कलाकृतींबरोबरच फडके व इतर शिल्पकार यांच्याही कलाकृती मांडल्या होत्या. त्याखेरीज त्या प्रदर्शनात प्राचीन भारतीय कलेचे आणि स्त्रियांच्या विणकामाचे व भरतकामाचे

उत्कृष्ट नमुनेही प्रदर्शित करण्यात आले होते. सर्व प्रकारच्या कलांसंबंधी जनतेत अभिरुची उत्पन्न व्हावी आणि चित्रकारांना व शिल्पकारांनाही शक्य तेवढे प्रोत्साहन मिळावे हा केशवरावांचा वरील प्रदर्शनाच्या संयोजनामागील हेतू होता आणि तो पूर्णपणे सफल झाला. त्यांच्या ह्या उपक्रमाची खूप प्रशंसा नवाकाळ (७-११-१९२७), केसरी (१०-११-१९२७), मौज (५-११-१९२७), श्रद्धानंद (१०-११-१९२७) इत्यादी मराठी आणि द टाइम्स ऑफ इंडिया (२-११-१९२७), क्रॉनिकल (१४-१० १९२७), हेरल्ड (२३-११-१९२७) इत्यादी इंग्रजी नियतकालिकांनी केली होती. मुंबईच्या हेरल्ड या दैनिकाने तर आपल्या ११-११-१९२७-च्या अंकात ह्या विशाल व प्रेक्षणीय प्रदर्शनाचे वर्णन 'a miniature Wembley of Arts and Crafts' ह्या गौरवपूर्ण शब्दांत केले होते.

१९२७-च्या डिसेंबर महिन्यात मद्रासला कॉंग्रेसचे अधिवेशन भरले होते. तेथेही केशवरावांनी फडके यांचे शिल्पकलाप्रदर्शन मांडले होते व त्याची तेथे अतिशय वाखाणणी झाली होती. परंतु, तेथून मुंबईस परत गेल्यावर ह्या दोघा शिल्पकारांत मतभेद झाले. परिणामी केशवरावांनी फडके यांची नोकरी सोडली आणि त्यांनी स्वतंत्र स्टुडिओ स्थापन करून महात्मा गांधींची सूतकताई, महात्माजींचे ऑपरेशन, श्रीलक्ष्मीनारायण मंदिर, मुमताज, श्रीकृष्णजन्म, विश्वामित्रमेनका, श्रीकृष्णलीला, यशोदाकृष्ण, सीताहरण, सेक्रेटरीचे ऑफिस, दारूबंदी, लोकमान्यांचे अंत्यदर्शन, मुंबईचा पारीवाला हमाल, वेणीवाला, फळविक्रेता, ज्योतिषी, पोलीस इत्यादी देखाव्यांची मेणाची व प्लॅस्टरची हालती चित्रे बनवली आणि भारतातील जवळजवळ सर्व प्रमुख शहरांत प्रदर्शने मांडली. त्यांनी १९२८ साली कराचीतील बंदर रोडवर मांडलेले प्रदर्शन हजारो शिल्पप्रेमींचे आकर्षण ठरले होते आणि द सिंध ऑब्झर्व्हर या दैनिकाने आपल्या २४-३-१९२८-च्या अंकात त्याचे बहारदार रसग्रहण केले होते. त्याच तारखेच्या 'कराची हिंदेच्छु' या गुजराती दैनिकाने ह्या प्रदर्शनाचे उत्तम प्रदर्शन ह्या शब्दांत वर्णन करून प्रदर्शनातील पुतळे जिवंत व्यक्तींसारखे भासतात, अशी तारीफ केली होती. नोव्हेंबर-डिसेंबर १९२८ मध्ये केशवरावांनी नागपूरमधील चिटणीस पार्कमध्ये आपले शिल्पकला-प्रदर्शन मांडले होते. त्यातील हुबेहूब व डौलदार मेणाची चित्रे पाहून हर्षभरित झालेल्या श्रीमंत राजेबहादूर रघुजीराव भोसले यांनी केशव बाबुराव यांस सुवर्णपदक देऊन त्यांचा बहुमान केला होता. ह्या संबंधीचे वृत्त नागपूरच्या 'महाराष्ट्र' ने आपल्या १९-१२-१९२८-च्या अंकात

छापले होते.

१९३० साली केशवरावांनी मुंबई, मद्रास इत्यादी शहरांत आपल्या शिल्पांचे प्रदर्शन भरवून अमाप नावलौकिक संपादन केला होता. मराठी, इंग्रजी व गुजराती ह्या तिन्ही भाषांतील वृत्तपत्रे केशवरावांच्या शिल्पकलाकौशल्याची प्रशंसा मुक्तकंठाने करीत असत.

कराची येथे १९३१ साली भरलेल्या 'खादी प्रदर्शना'तील लेले यांच्या शिल्पकला-दालनास स्वतः महात्मा गांधी यांनी २५-३-१९३१ रोजी भेट दिली होती आणि सर्व शिल्पे रसिकतेने बघून केशवरावांची वाखाणणी (~~Karachi Khadi Exhibition Bulletin, No. 12, 29-3-1931~~) केली होती (कराची खादी एग्झिबिशन बुलेटिन, १२-१२, २९-३-१९३१).

केशवरावांनी १९३१ ते १९४५ या कालावधीत अहमदनगर, अहमदाबाद, इंदूर, कलकत्ता, कुंभकोणम, तंजावर, त्रिचनापल्ली, मद्रास, सुरत इत्यादी अनेक शहरांत शिल्पकला-प्रदर्शन मांडून अनेक सुवर्णपदके व प्रशस्तिपत्रे मिळविली होती. एक उत्तम शिल्पकार, कुशल संयोजक व यशस्वी संघटक म्हणून केशवरावांनी स्वदेशात तसेच परदेशांत अमाप प्रसिद्धी प्राप्त केली होती. त्यांचे निधन ५-१-१९४५ रोजी दादर (मुंबई) येथे वयाच्या अवघ्या पंचेचाळिसाव्या वर्षी झाले. पण एवढ्या अल्प आयुष्यात त्यांनी असामान्यसाधारण यश मिळविले होते.

केशवरावांची राहणी साधी असे. धोतर, शर्ट, कोट व टोपी असा त्यांचा पोशाख असे. ते भगवद्गीतेचा एक अध्याय सकाळच्या भोजनापूर्वी नियमाने वाचीत असत. ते पूर्णपणे निर्व्यसनी असून शाकाहारी होते. संकटग्रस्त व्यक्ती व सामाजिक संस्था यांना सढळ हाताने मदत करण्यास त्यांना नेहमीच आनंद वाटत असे. मुरार गाव, वडिलोपार्जित कौलारू घर, आई व बहीण या सर्वांवर त्यांचे उत्कट प्रेम होते. कै. काशीनाथ त्र्यंबक लेले हे त्यांचे परम मित्र होते. त्या दोघांची भेट आठवड्यातून किमान एकदा तरी अवश्य होत असे. त्यांचा बराचसा वेळ शिल्पकलेच्या उपासनेतच व्यतीत होत असे.

आजच्या युवा पिढीला भूतकालातील ह्या असामान्य शिल्पकाराच्या कार्यकर्तृत्वाचा परिचय व्हावा व तो त्यांना प्रेरणादायी वाटावा ह्या हेतूने केशवरावांच्या कामगिरीचा हा थोडक्यात आढावा घेतला आहे. त्यांचे चरित्र लवकरच प्रकाशित होत आहे.

---